# जाहीरात नमुना क्र १ - सन २०२५ - २६
# जिल्हा एकात्मिक आरोग्य कुटूंब कल्याण सोसायटी
# राष्ट्रीय आयुष अभियान,जिल्हा परीषद अलिबाग, रायगड

राष्ट्रीय आयुष अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, रायगड येथून रायगड जिल्हयांतर्गत आयुष्यमान आरोग्य मंदीर स्तरावर आयुष आरोग्यवर्धिनी केंद्र उपकेंद्र स्तरावर साप्ताहिक योगसत्र राबविण्याकामी, मानधन तत्वावर एकूण ६ ठिकाणी योग प्रशिक्षक यांची तालुकास्तरीय योग प्रशिक्षक पॅनल निवड प्रक्रिया राबविण्यात येत असुन, सदरील पदे ही रोजंदारी तत्वावरील मोबदला स्वरुपात असुन, खालील तक्तानुसार पात्र ठरत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदाचे नाव | रिक्त पद संख्या | पदांची शैक्षणिक अर्हता | प्रति सत्र मोबदला | वयो मर्यादा | तालुक्यांचे नाव - आरोग्यवर्धिनी केंद्र (HWC) व संख्या |
|---|---|---|---|---|---|
| योग प्रशिक्षक | ६ | खालीलपैकी कोणतेही एक असणे अनिवार्य<br>१) Ph.D in Yoga.<br>२) M.Phill in Yoga.<br>३) Post Graduate Degree in Yoga.<br>४) Degree (UGC Approved) BYNS (Bachelor of Naturopathy and Yogic Science)<br>५) Post Graduate Diploma in Yoga.<br>६) Diploma in Yoga<br>७) YCB/QCI-Level-3/Level-2/ Level-1<br>८) Renowned Institute Certificate in Yoga<br>वरील क्रमाने प्राधान्यक्रम दिला जाईल० | रु.८०००/- प्रतिमहा मानधन देय असून रु.२५०/- प्रतितास याप्रमाणे कमीत कमी ३२ तास प्रतिमहा योग सत्र घेणे | कमीत कमी १८ वर्ष ते जास्तीत जास्त ६५ वर्षपर्यंत | १. आयुष्मान आरोग्य मंदिर सुडकोली (ता. अलिबाग)<br>२. आयुष्मान आरोग्य मंदिर नादगाव (ता. मुरुड)<br>३. आयुष्मान आरोग्य मंदिर पाबरे (ता. म्हसला)<br>४. आयुष्मान आरोग्य मंदिर बागमांडला (ता. श्रीवर्धन)<br>५. आयुष्मान आरोग्य मंदिर कुडगाव (ता. श्रीवर्धन)<br>६. आयुष्मान आरोग्य मंदिर आदगाव (ता. श्रीवर्धन) |

अटी व शर्ती: -

१) वरील सर्व पदे ही रोजंदारी दैनंदिन व प्रति सत्र मोबदला या स्वरुपाची असुन, पॅनल स्वरुपात निवड करणेत येत आहे त्याचा कालावधी हा दि २९/०६/२०२७ पर्यन्तचा राहील. वरील सर्व पदांची सेवा दिनांक २९/०६/२०२७ रोजी आपोआप संपुष्टात येईल. वरील पदे सन २०२६-२७ करीता मंजूर झाल्यास पुढील ११ महिने व २९ दिवस या कालावधीकरीता पुनर्नियुक्ती समाधानकारक कामकाजानंतर देण्यात येईल. तसेच प्रत्येक ठिकाणी एक एक पद असल्याने सामाजिक आरक्षण लागू होत नाही.

२) उमेदवारांकडून दिनांक /०५/२०२६ ते दिनांक /०५/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत, सुट्टीचे दिवस वगळून सकाळी ११.०० ते दुपारी ०५.०० या वेळेतच अर्ज स्विकृती करण्यात येईल. अर्ज स्विकृती ही जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक आयुष कक्ष, राष्ट्रीय आयुष अभियान, कार्यालय जिल्हा आरोग्य अधिकारीस्तर जिल्हा परिषद, या ठिकाणी करण्यात येईल तालुकानिहाय योग प्रशिक्षक पॅनल तयार करावयाचे असल्याने, एका उमेदवारांने फकत एकच अर्ज करुन, एकच आयुष्मान आरोग्य मंदिरसाठी अर्ज सादर करावा.

३) योग प्रशिक्षक हे पद रोजंदारी व दैनंदिन स्वरुपाची व प्रति सत्र मोबदला वरील असल्याने, सदर पदाकरीता शासकिय सेवेनुसार असलेले नियम, अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही त्याचसोबत यावरील सर्व पदाकरीता शासनाकडील सेवा नियम लागू होत नाहीत.

४) सर्व पदांकरिताकरीता उमेदवारांनी अर्ज सादर करताना १० वी गुणपत्रक आणि सनद जन्म तारीख पुरावा म्हणुन १२ वी गुणपत्रक (१ ले वर्ष सर्व Attempt यह जेणेकरुन एकत्रित गुणा होईल पदवी प्रमाण पत्र (Convocation Certificate), त्या-त्या शैक्षणिक अर्हतेसंबंधित परिषदेकडील मणी लागू आहे त्या त्या शैक्षणिक अर्हतेची वैद्य असलेली परिषदेकडील नोंदणी प्रमाणपत्र, वय अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र याचा पुरावा म्हणुन (शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला) व इतर आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (साक्षांकित / स्वसाक्षांकित करुन जोडावीत.

५) प्रमाणपत्रामध्ये Grading System नुसार गुण असतील त्यांनी संबंधित प्रमाणपत्रामागील Calculation Grade Card झेरॉक्स अर्जासोबत जोडण्यात यावी Calculation Formula नसेल तर संबंधित कॉलेज/संस्थेकडून त्यांचे गुणांमध्ये रुपांतर करुन ते प्रमाणित करुन अर्जासोबत जोडावे (विशेषतः CGPA/ SGPA), अर्जासह जोडलेल्या सर्व कागदपत्रावर पृष्ठ क्रमांक टाकण्यात यावेत अर्ज सादर केल्याची पोहोच घेणेकरीता अर्जाच्या वरील पृष्ठभागाची झेरॉक्स घेऊन येणे.

६) जाहिरातीतील पदाकरीता नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हतेसोबत, संबधित परिषदेकडील नोंदणी करणे लागू होत असल्यास, उमेदवाराने वैध असलेली नोंदणीचे प्रमाणपत्र / Renewal Slip/Smart Card अनुभव प्रमाणपत्र व इतर बाबी अर्जासोबत सादर कराव्यात. त्याचसोबत अतिरीक्त शिक्षणाची नोंद ही परिषदेकडे केलेली असावी परिषदेकडील Smart Card असलयास त्याची झेरॉक्स प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी तसेच सदरील प्रमाणपत्रावरील नोंदणीची वैधता ही ग्राहय धरणे सोयीस्कर होईल.

७) उपरोक्त पदभरतीबाबत असलेल्या सर्व सुचना (तात्पुरते पात्र/अपात्र, हरकती स्विकारणे, अंतिम पात्र/अपात्र, संभाव्य निवड झालेल्यांची यादी, निवड समितीमार्फत मुलाखत व प्रात्याक्षिक प्रक्रियाबाबतचे वेळापत्रक व इतर बाबी) हया जिल्हा परिषद, रायगड चे अधिकृत सकेतस्थळ www.zpraigad.gov.in वर प्रसिध्द करण्यात येतील याबाबत उमेदवारांत कोणतेही सुचना दूरध्वनी निरोप, SMS, Email केला जाणार नाही यांची उमेदवारानी नोंद घेण्यात यावी उमेदवारांनी वेळोवळी संकेतस्थळास भेट देणे अनिवार्य राहिल.

८) सदर रिक्त पदांची संख्या, शैक्षणिक अर्हता, मानधन, वयोमर्यादा, सामाजिक आरक्षण, नियुक्ती ठिकाणामध्ये बदल, नमुद केलेल्या अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन पदभरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, रायगड यांनी राखुन ठेवलेले आहेत.

९) ठराविक प्रमाणपत्र सादरीकरण करणेकामी सेतु कार्यालयाकडील पावती अर्जासोबत सादर केलेली असल्यास, सदरील उमेदवारांचे अर्ज तात्पुरत्या पात्र/अपात्र यादीमध्ये अपात्र ठरविण्यात येतील. परंतु, उमेदवारांनी हरकती वेळेस सदरील सेतु कार्यालयाकडील प्रमाणपत्र सादर केल्यास संबधित उमेदवारांचे अर्ज अंतिम पात्र/अपात्र यादी मध्ये पात्र ठरविण्यात येतील यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी.

१०) पॅरावैदयकिय परिषदेकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणतेही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी. तथापि वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल, तसेच परिषदेकडील नोंदणी करणेकामी फी भरलेली पावती, नोंदणी करीता सादर केलेला अर्जाची प्रत अर्जासोबत जोडल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही. संबधित उमेदवाराकडे नोंदणीचे प्रमाणपत्र व वैध असलेले प्रमाणपत्र असणे अपेक्षित आहे.

११) अर्जाचा नमुना हा जिल्हा परिषद रायगड च्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असुन, सदरील अर्जाचा नमुना प्रिंट मध्ये अर्ज नसल्यास उमेदवारांचा अर्ज स्विकारला जाणार नाही यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी.

१२) उमेदवारांकडून अर्धवट, अपूर्ण, वाचण्यायोग्य नसलेला अर्ज सादर केले जाऊ नयेत, संबंधित उमेदवारांचा अर्ज नाकारला गेल्यास, अथवा अपात्र ठरला गेल्यास त्याबाबतची सर्वस्वीपणे सपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहिल याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार स्विकारली जाणार नाही. अर्ज भरणेकामी काही अडचणी असल्यात कार्यालयास समक्ष भेट देऊन विचारणा करण्यात यावी.

१३) उमेदवार हा संबंधित पदासाठी शाररीक व मानधिक दृष्ट्या सक्षम असावा. तसेच उमेदवारांविरुदध कोणत्याही स्वरुपाचा फोजदारी गुन्हा झालेला नसावा तसेच तो शासकिय, निमशासकिय अथवा NHM मधील कार्यरत कर्मचारी नसावा आणि असल्यास सदर पदावर संबंधिताची नियुक्ती झाल्यास उमेदवाराने शासकिय / NHM सेवेचा राजीनामा देणे बंधनकारक राहिल. राजीनामा मंजुरी नंतर उमेदवारास योग प्रशिक्षक पदावर रुजू करुन घेतले जाईल.

१४) केंद्र सरकार अथवा राज्य शासनाकडून संबधित पद नामंजूर केल्यास उमदेवारांस कोणतीही पुर्वसुचना न देता संबधित उमेदवारांची सेवा तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

१५) योग प्रशिक्षक जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत पात्र उमेदवारांची त्यांच्या वरील तक्तातील शैक्षणिक अर्हतिप्रमाणे योग प्रात्याक्षिक व मुलाखत प्रक्रियेब्दारे संबंधित आयुष्मान आरोग्य मंदिर साठी पॅनल तयार करण्यात येईल. तसेच त्यांना तालुका आरोग्य अधिकारी यांचे स्तरावरुन १ किवा अधिक आरोग्यवर्धिनी केंद्र ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल. नियमानुसार एका दिवेशी जास्तीत २ ठिकाणी योग सत्र घेता येईल.

१६) वैयक्तिक किंवा २ पेक्षा जास्त सत्रास अनुपस्थिती राहिल्यास, कार्यालयाकडून एकतर्फी निर्णय घेऊन, दिलेली नियुक्ती रद्द करुन, पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

१७) वयाचा पुरावा म्हणून उमेदवारांने शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (सनद) सादर करती अथवा ज्यावरून उमेदवारांची जन्मतारीख ग्राहय धरणे सोईस्कर होईल अशा पध्दतीचे प्रमाणपत्र सादर करावे.

१८) उमेदवारांनी मुद्दा क्रमांक ०२ मधील नमुद केलेल्या कालावधीमध्ये, कार्यालयीन दिवशी, दिलेल्या वेळेत व्यक्तीशः उपस्थित राहुन अर्ज सादर करण्यात यावेत नमुद मुदती अगोदर अथवा मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार अथवा कोणताही दबाव आणण्याचा प्रयत्न करु नये.

१९) अर्जासोबत कागदपत्रे जास्त प्रमाणात होत असल्यास, स्टेपलरपिन चा वापर करण्याऐवजी उमेदवारांनी अर्जाची कागदपत्रे एकत्रितपणे जोडणेकामी टॅग अथवा लेसचा वापर करावा

२०) पदभरतीतील पदे ही राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत दि २७/०४/२०२३ रोजीच्या पत्रातील दिलेल्या सुचनेनुसार गुणांकन पध्दतीने भरली जातील, गुणांकन पध्दत ही पुढील प्रमाणे राहिल.

| अ.क्र. | विवरण | | |
|---|---|---|---|
| | पदासाठी आवश्यक Qualifying Exam मधील गुण (पदवी अथवा पदविका (अंतिम वर्षाचा गुणांचा आधारे) | मिळालेल्या एकुण गुणाच्या कैवारीचे ५०% प्रमाणे Proportion राहील (उदा ६०% गुण प्राप्त असल्यात त्यांचे ५०% प्रमाणे) (proportion=६० x ५०/१००=३० गुण) | जास्तीत जास्त ५० गुण ग्राहय धरले जातील |
| | पदासाठी मावश्यक शैक्षणिक महतेपेक्षा अधिक शैराणिक बहुता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकाची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घेण्यात येईल) | अधिकतम २० गुण ग्राहय धरले जातील. मिळालेल्या एकुण गुणाच्या २०% प्रमाणे (उदा एका पदांची आयुध शैक्षणिक अर्हता पूर्ण Proportion प्रमाणे काडाय करुन अतिरीक्त MA ही शैक्षणिक अर्हता पुर्ण केलेल्या उमेदवारांस MA करीता ६० % गुण। प्राप्त असल्यास त्यांचे प्रमाणे गुण काढण्यात येतील = ६०•२०/१००० १२ गुण) | जास्तीत जास्त २० गुण ग्राहय धरले जातीय |

| | | | |
|---|---|---|---|
| | योग प्रात्याक्षिक व मुलाखत | | जास्तीत जास्त ३० गुण ग्राह्य धरले जातील |
| | | | एकूण १०० गुण |

२१) सदरीत गुणांकनानुसार, गुणवत्तेप्रमाणे निवड करताना उमेदवारांची आयुष्मान आरोग्य मंदिर साठी पॅनल यादी तयार करण्यात येऊन, उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवारांचे वय जास्त असेल त्यास प्रथमतेने निवडण्यात येईल. जर वयामध्ये एकसमानता येत असल्यास, संबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त बसेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी.

२२) अर्जासोबत नमुद करण्यात येते असलेला मोबाईल क्रमांक हा संपूर्ण पदभरती प्रक्रिया होईपर्यन्त चालु स्थितीत राहण्याची दक्षता उमेदवारांनी घेण्यात यावी.

जिल्हा आयुष अधिकारी
तथा सदस्य, योग प्रशिक्षक पदभरती निवड
समिती,
जिल्हा परिषद, रायगड,

PHM

जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा अध्यक्ष, योग प्रशिक्षक पदभरती निवड
समिती,
जिल्हा परिषद, रायगड

योग प्रशिक्षण संस्था प्रमुख
तथा सदस्य, योग प्रशिक्षक पदभरती निवड समिती,
जिल्हा परिषद, रायगड,

# राष्ट्रीय आयुष अभियान

## रायगड जिल्हा परिषद-अलिबाग

## योग प्रशिक्षक या पदासाठी अर्ज

अर्जदाराचा फॉर्म क्र .....
(Office use Only)

अर्जदाराचे नाव :- ______________________

अर्जदाराचे संपुर्ण पत्ता:______________________

अर्जदाराची जन्म तारीख :______________________

भ्रमणध्वणी क्रमांक :______________ ई-मेल आयडी :- ______

शैक्षणीक अर्हता :- ______________________

| अ.क्र. | पदवी/पदवीका/पदव्युत्तर पदवीका | अंतीम उत्तीर्ण वर्ष व मिळालेल्या गुणांची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |

अनुभव असल्यास खालील तक्त्यात नमुद करावे.

| अ.क्र. | शासकिय/निमशासकिय/स्थानिक संस्था अथवा राष्ट्रीय आरोग्य अभियान | अनुभव कालावधी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |

अर्जासोबत खालील छायांकित प्रत जोडल्या आहेत.

१) ______________________________

२) ______________________________

३) ______________________________

४) ______________________________

५) ______________________________

## "प्रमाणपत्र"

मी असे प्रमाणीत करतो/करते की, वर नमुद केलेली सर्व माहिती खरी असुन ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्यावर रदद करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशिर कार्यवाही होईल याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

ठिकाण :-

अर्जदाराची स्वाक्षरी

नाव :-

| | | |
|---|---|---|
| NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र | **आरोग्य सेवा**<br>राष्ट्रीय आरोग्य अभियान, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग | बेटी बचाओ save the girl child |

| | |
|---|---|
| फोन नं. ०२१४१-२२०२०१<br>ईमेलआयडी - dhozpraigad@gmail.com | जा.क्र.राजिप/एनएचएम/आरोग्य/आवससु/ 01 /२०२६रायगड जिल्हा परिषद, अलिबाग<br>दिनांक :- 11 /०५/२०२६ |

प्रति,
मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
तथा संकेतस्थळ वेब व्यवस्थापक (W.I.M.)
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

विषय :- रायगड जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देणेबाबत.
संदर्भ :- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी रा.जि.प.अलिबाग यांची मंजूर टिपणी दि.०५/०३/२०२६

संदर्भिय पत्रा नुसार राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत आयुष आरोग्यवर्धिनी केंद्र स्तरावर योग प्रशिक्षक भरावयाचे आहे. त्या करिता मार्गदर्शक सुचनांनुसार संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करावयाची आहे. सदर कक्ष रायगड जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाशी संलग्न असून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मा.प्र.) यांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचे संकेतस्थळ अद्ययावत ठेवणेबाबतची कार्यवाही या कक्षामार्फत केली जाते.

सबब Zpraigad.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर खालील नमुद केल्याप्रमाणे माहिती प्रसिध्द करणेस विनंती आहे.

| | |
|---|---|
| संकेतस्थळावरील मुख्य पानावरील Home Page कळीचे संक्षिप्त नांव (Tab Name) | आयुष आरोग्यवर्धिनी केंद्र स्तरावर योग प्रशिक्षक भरती संदर्भातअर्ज मागविणे बाबत |
| संकेतस्थळावर अंतर्गत पानावर दिसणाऱ्या दुव्याचा तपशिल (Link Detail) | योग प्रशिक्षक भरती अर्ज |
| संकेतस्थळावर माहिती दिसण्याचा कालावधी | दिनांक - ११-०५-२०२६ ते १८-०५-२०२६ |

तसेच मी प्रमाणित करतो की, जोडलेल्या प्रसिध्द करण्यासाठी दिलेल्या माहितीमध्ये कोणाचेही व्यक्तीगत माहिती (उदा. जन्मतारीख, मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक, पॅन क्रमांक, बँक खाते क्रमांक इत्यादी) यासारखी इतर संवेदनशील माहिती समाविष्ट नाही.

PHN

जिल्हा आरोग्य अधिकारी,
रायगड जिल्हा परिषद,
अलिबाग-रायगड.

सोबत - प्रसिध्द करावयाच्या माहितीची प्रत या पत्रासोबत जोडली आहे.